CNR No. MHRG120003202021 नियमीत दिवाणी दावा क्र. २५/२०२१

विलास वि. सुधीर व इतर

## निशाणी क्र. २२ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिनांक १३/०६/२०२२ रोजी त्याच्या विरुध्द निशाणी क्र. १ कडे झालेला विना कैफियत आणि निशाणी क्र. १९ कडे विना म्हणणे आदेश रद्द करून कैफियत व म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, न्यायालयास हिवाळी सुट्टी असल्याने आणि वादीस प्रतिवादीने मारहाण केल्यामुळे तो दवाखान्यामध्ये दाखल झाल्यामुळे त्याला मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. या कारणास्तव वादीने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील नमूद करण्यात आलेल्या कारणाप्रमाणे कोणताही प्रकार घडला नाही. वादीने केवळ प्रतिवादींची बदनामी करण्यासाठी त्यांच्यावर आरोप लावला आहे. वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जातील आरोपाबाबत जोडले नाही. या कारणास्तव प्रतिवादींनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे. वादी वर्फे विद्वान वकील श्री. जस्मिन नाईक आणि प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री. ए. व्ही. देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील नमूद आरोपासंबंधी प्रस्तूत अर्जाकामी कोणतेही निष्कर्ष काढण्याजोगा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. अशा परिस्थितीमध्ये विलंबाचे कारण संयुक्तीक आहे असे म्हणता येणार नाही. असे असले तरी दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी न्यायाच्यादृष्टीने वादीस आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक दिसून येते. त्या करीता प्रस्तूतचा अर्ज ३००/- रुपये खर्चासह मंजूर करणे योगय होईल या मतास मी पोहोचलो आहे. करीता मी खालील आदेश पारीत करतो-

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादींना एकत्रित ३००/- रुपये खर्च देण्याच्या अटीवर वादी विरुध्द निशाणी क्र. १ आणि निशाणी क्र. १९ कडे झालेला विना कैफियत आणि विना म्हणणे आदेश रद्द करून कैफियत व म्हणणे दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १८/१०/२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड